# महाराष्ट्र राज्य पोलीस बिनतारी संदेश विभाग, पुणे
## प्रसिध्दीपत्रक माहे नोव्हेंबर - २०१७

**क्र.क / ५ / प्रसिद्धीपत्रक / ११ / २०१७** **दिनांक :- १३ / १२ /२०१७**

**१. नेमणूक / सेवासमाप्तीः- निरंक**

**2. पदोन्नती / पदावनती:-**

दिनांक ३१/१०/२०१७ रोजी आयोजित करण्यांत आलेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत निर्णय झाल्याप्रमाणे पोलीस बिनतारी संदेश विभागातील खालील नमूद भोजनसेवक (वर्ग-४) यांना सहाय्यक आचारी या पदावर कार्यभार ग्रहण केलेल्या तारखेपासून तात्पुरती व स्थानापन्न पदोन्नती देण्यात येवून त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी नेमणूक करण्यात येत आहे.

भोजनसेवक वेतनश्रेणी वेतन बॅन्ड पी.बी.४४४०-७४४० + ग्रेड वेतन रु. १३००/-
सहाय्यक आचारी वेतनश्रेणी वेतन बॅन्ड पी.बी.४४४०-७४४० + ग्रेड वेतन रु. १६००/-

| अ.क्र. | भोजनसेवक यांचे नांव व जातीचा प्रवर्ग | सध्याची नेमणूक व आस्थापना | पदोन्नतीवरील नेमणूकीचे ठिकाण व आस्थापना | पदोन्नती प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.संदीप माणिक ढवाण | प्रशिक्षण केंद्र, संचालक कार्यालय,पुणे | प्रशिक्षण केंद्र, संचालक कार्यालय,पुणे | खुला |

वरील नमूद भोजनसेवक यांना देण्यात आलेली सहाय्यक आचारी पदावरील तात्पुरती पदोन्नती ही खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१. पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदातील वेतनवाढीनंतर वेतन निश्चितीकरिता दयावयाच्या विकल्पासंबंधी शासन अधिसूचना वित्त विभाग क्रमांक वेपूर १२९८/प्र.क्र.१३/९८/सेवा-१०,दिनांक १०/१२/१९९८ च्या आदेशाची माहिी सहायक आचारी या पदावर पदोन्नती झालेल्या कर्मचा-यास दयावी.असा विकल्प दयावयाचा असेल तर त्यांनी पदोन्नती मिळाल्या तारखेपासून एक महिन्याच्या आत असा विकल्प दयावा.मुदतीत विकल्प न आल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही व त्यांची वेतननिश्चिती म.ना.से.(वेतन) नियम क्र.११ (एक)(ए) प्रमाणे करण्यात येईल याची संबंधितास समज दयावी.

**२.** कालबध्द पदोन्नती घेतली असल्यास संबंधीत कर्मचा-यास पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चीती अनुज्ञेय असणार नाही. संबंधीत कर्मचारी पदोन्नती स्विकारण्यास तयार नसतील तर त्यांची कालबध्द पदोन्नती(वरिष्ठ वेतनश्रेणी)काढून घेण्यात यावी व त्याप्रमाणे अहवाल सादर करण्याची तजवीज ठेवावी.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-2/सहा-आचारी-पदोन्नती /2017/ 5550 दि.०७/११/२०१७ )**

**३.सेवानिवृत्ती / स्वेच्छासेवानिवृत्ती :-**

१. श्री.विश्वनाथ शालिकराम सिडाम, पोलीस नाईक (कर्मशाळा मदतनीस) नेमणूक बिनतारी संदेश विभाग, गडचिरोली यांनी दि.३१/१०/२०१६ पासुन स्वेच्छासेवानिवृत्ती मंजुर होणेस विनंती केली होती. प्रस्तुत प्रकरणी श्री.सिडाम यांना दिनांक २७/१०/२०१७ रोजी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ (४) (बी) मधील तरतूदीनुसार,अपर पोलीस महासंचालक वसंचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आज्ञांकित कक्षात बोलाविण्यात आलेहोते. तथापि ते आज्ञांकित कक्षात उपस्थित राहिलेले नाहीत.

२. त्यानंतर श्री.सिडाम हेदिनांक ०६/११/२०१७ रोजी आज्ञांकित कक्षात उपस्थित राहिले असून, त्यांनी समक्ष केलेल्या विनंतीनुसार, महाराष्ट्र नागरीसेवा (निवृत्तीवेतन ) नियम १९८२ मधील नियम ६५ (१) नुसार, त्यांना **दिनांक ११/११/२०१७ रोजी मध्यान्हपुर्व पासून स्वेच्छासेवानिवृत्त होण्यास मंजुरी देण्यात येत आहे**. त्यांना नियमानुसार

लागू असलेले सेवानिवृत्तीचे सर्व फायदे, काही शासकीय येणे वसूली असल्यास, सदर रकमेची वजाती करुन, त्यानंतर अनुज्ञेय आहेत.

३. श्री.सिडाम यांना दि.११/११/२०१७ रोजी मध्यान्हपुर्वपासून सेवामुक्त करण्यात यावे आणि पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा. त्यांचे नांव दि.११/११/२०१७ मध्यान्हपुर्व पासून हजेरीपट वइतर तत्सम शासकीय अभिलेखावरुन कमी करण्यात यावे. त्यांच्याकडील ओळखपत्र जमा करुन घेण्यात यावे.शासकीय निवासस्थानात राहात असल्यास विहित मुदतीत शासकिय निवासस्थान रिक्त करुन घेण्यात यावे.

**( अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई -4/स्वेसेनि / पोना (कम) / सिडाम /2017 /५६०० दि. १०/११/२०१७ )**

**२.**पोलीस बिनतारी संदेश विभागाचे आस्थापनेवरील नवप्रविष्ठ पोहवा/यंचा पकंज प्रकाश ठोंबरे नेमणूक बिनतारी संदेश, मुंबई त्यांचा पोलीस हवालदार (यंत्रचालक) पदाचा राजीनामा दि.१९/६/२०१७ च्या अर्जान्वये दिलेला आहे.त्यानुसार त्यांचा राजीनामा मंजुर करण्याची बाब विचाराधीन होती. ठोंबरे यांनी शासन निर्णय सामान्य प्रशा सन विभाग क्र. एसआरव्ही - १०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८ दि. ०२/१२/२०१७ च्या तरतुदीनुसार एक महिन्याचे मूळ वेतनाची रक्कम व नियुक्ती आदेशानुसार हमीपत्र व बॉण्डनुसार रक्कम रु.७५,०००/-शासनाच्या तिजोरीत जमा केलेली आहे. त्यानुसार त्यांचा राजीनामा स्विकृत करण्यात येत आहे. नवप्रविष्ठ पोहवा / यंचा पकंज प्रकाश ठोंबरे नेमणूक बिनतारी संदेश, मुंबई यांचा पोलीस हवालदार (यंत्रचालक) पदाचा राजीनामा दि.२०/६/२०१७ पासून स्विकृत करण्यात आल्याने त्यांचे नाव हजेरीपट व इतर सर्व अभिलेखातून कमी करण्यात यावे.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई- 3/नवपोहवा (बियंचा)/ ठोंबरे /2017/ 5727 दि.२०/११/२०१७ )**

**४. बदली :- निरंक**

**५. बक्षिस :-**

१. कामगिरीचा तपशील :- खालील नमूद कर्मचारी यांनी वेळोवेळी वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या प्रकरणांचा वेळेत निपटारा केला. तसेच त्यांना नेमून दिलेले आपले टेबलचे कामकाज वरिष्ठांच्या सुचनेनुसार विहीत वेळेत पूर्ण केले. कोट केसेस,मॅट केसेस, शासन स्तरावर व पोलीस महासंचालक कार्यालय यांचेकडे वेळोवेळी प्रस्ताव सादर करणे, कालबध्द पदोन्नती/आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देणे, निवडसूची तयार करणे, पदोन्नती, अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाजेष्ठता यादया तयार करणे, माहिती अधिकाराची प्रकरणे इत्यादी वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन प्रशासकीय कामे वेळेत व अचूक पध्द्तीने पार पाडलेबाबत त्यांना प्रोत्साहनपर बक्षिस मंजूर करण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **नांव** | **हु-1** | **नेमणूकीचे ठिकाण** | **बक्षिस रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.एस.जी.देशमुख | सपोउनि/प्रयंचा | म.त.का.पुणे | रु.५००/- व जीएसटी |
| ०२ | श्री.आर.एस.आंबीकर | पोहवा/बियंचा | म.त.का.पुणे | रु.५००/- व जीएसटी |
| | | | एकूण | रु.१,०००/- |

**( अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई / ७ / ७०६ / बक्षिस / २०१७ / ५५५१ दि. ०७/११/२०१७ )**

२.कामगिरीचा तपशील :- दिनांक ०१/०४/२०१७ ते दि.३१/०८/२०१७ या कालावधीत संचालक कार्यालयातील आस्थापना शाखा, लेखा शाखा, प्रशासन शाखा येथील लिपीकांना मार्गदर्शन करुन प्रलंबित प्रकरणांचा निपटारा केला. पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई, महाराष्ट्र शासन व इतर वरिष्ठ कार्यालयाकडून मागविण्यात आलेली माहिती व प्राप्त प्रकरणांचा विहीत वेळेत निपटारा करण्याकरीता कार्यालयीन वेळेनंतर कार्यालयात उशिरा पर्यत थांबून संबंधित कर्मचा-यांना मार्गदर्शन करुन कामे पूर्ण करुन घेतली याबाबत खालील नमूद कार्यालय अधिक्षक यांना प्रोत्साहनपर मानधन मंजूर करण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **नांव** | **हु-1** | **नेमणूकीचे ठिकाण** | **मूळ वेतन +ग्रेड वेतनाच्या १०- मानधन रक्कम** |
|---|---|---|---|---|

| | | | | रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती एस.आर.भालचिम | कार्यालय अधिक्षक | संचालक कार्यालय,पुणे | रु.१,९६८/- |

३. कामगिरीचा तपशील :-खालील नमुद कर्मचारी यांनी त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या ठिकाणी वरिष्ठ अधिकारी यांचे कक्षात होणा-या महत्वाच्या बैठकीस कार्यालयीन वेळेत , कार्यालयीन वेळनंतरही उशिरपर्यत उपस्थित राहुन , सुटींचे दिवशी कार्यालयात उपस्थित राहुन कर्तव्य पार पाडलेबाबत त्यांना प्रोत्साहनपर मानधन मंजूर करण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **नांव** | **हु-1** | **नेमणूकीचे ठिकाण** | **मूळ वेतन +ग्रेड वेतनाच्या १०- मानधन रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.एस.एन.ननावरे | कार्यालयीन शिपाई | पो.अ.बि.सं.मुख्यालय,पुणे कक्ष, संचालक कार्यालय,पुणे | रु.१२०६/- |
| ०२ | श्री.पी.ए.पोहरे | कार्यालयीन शिपाई | संचालक पो.बि.सं.म. राज्य, पुणे , कक्ष, संचालक कार्यालय,पुणे | रु.११६४/- |
| ०३ | श्री.आर.सी.कोठावळे | कार्यालयीन शिपाई | पो.उपमहानिरीक्षक, पो.बि. सं.म.राज्य,पुणे , कक्ष, संचालक कार्यालय,पुणे | रु.१०९८/- |
| ०४ | श्रीमती व्ही.सी.जगताप | कार्यालयीन शिपाई | कार्यालय अधिक्षक, कक्ष, संचालक कार्यालय,पुणे | रु.१०९८/- |

**( अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई / ७ / ७०६ / मानधन / २०१७ / ५५५२ दि. ०७/११/२०१७ )**

**६. शिक्षा :- निरंक**

**७.निधनः-** श्री.प्रमोद हरिदास शिर्सेकर, पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) नेमणूक बिनतारी संदेश विभाग, मुंबई यांचे दिनांक ०१/११/२०१७ रोजी निधन झाल्याने, त्यांचे नांव बिनतारी संदेश विभागाच्या सर्व शासकीय अभिलेखातून दिनांक ०२/११/२०१७ पासून कमी करण्यात येत आहे. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र. पोमसं/२८-अे/४९३७/ निधनानंतरच्या देय रकमा/१६३/२०१६ दिनांक ०३/०९/२०१६ नुसार दिलेल्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे दिवगंत शिर्सेकर यांचे वारसदारास देय रकमा व इतर सवलती वेळेवर अदा करण्याबाबतची संपर्क साधण्यासाठी आपले आस्थापनेवरील संबंधित अधिका-याचे नाव, पदनाम व दूरध्वनी क्रमांक याबाबतची सविस्तर माहिती दिवगंत शिर्सेकर यांचे वारसांना कळवून त्याची प्रत या कार्यालयास पाठवावी आणि कै.शिर्सेकर यांचे प्रमाणपत्र प्राप्त करुन या कार्यालयास सादर करावे.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई - ४/मृत्यू/ पोशि (कम) शिर्सेकर/२०१७/५६७८ दि. १७/११/२०१७ )**

**८. संकीर्ण**:-

**१)** पोलीस हवालदार /यंत्रचालक अल्का समरजीत ठाकुर, नेमणुक बि.सं. नागपुर ग्रामीण यांनी, त्यांचा विवाह झाल्यामुळे महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन २१ मार्च २०१३ फाल्गुन ३०, शके १९३४ पान क्र, १८४ नोंदणी क्र. एन - १४८९६ अन्वये अल्का सचीन चवरे असे नवीन नाव धारण केलेले आहे. यास्तव यापुढे बिनतारी संदेश विभागाच्या सर्व शासकीय अभिलेखात, पोलीस हवालदार / यंत्रचालक अल्का समरजीत ठाकुर यांचे नाव अल्का सचीन चवरे असे नमुद करण्याची अनुमती देण्यात येत आहे. त्यानुसार सर्व शासकीय अभिलेखात योग्य तो बदल करण्यात यावा. पोलीस हवालदार /यंत्रचालक अल्का समरजीत ठाकुर नेमणुक बि.सं.वि नागपुर ग्रामीण यांचे सेवापुस्तकात योग्य ती नोंद घेऊन राजपत्राची प्रत सेवापुस्तकात जोडण्यात यावी.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई -३/यंचा/ठाकुर/नावात बदल/ २०१७ / ५६०७ दि.१०/११/२०१७ )**

२) पोलीस हवालदार/यंत्रचालक अमित विश्वनाथ पोलके नेमणुक बि सं वि नागपुर शहर यांनी महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन,वर्ष 3,अंक ओ-(18) गुरुवार ते बुधवार,4-10,2017/ वैशाख 14-20, शके 1939 नोंदणी क्र एन-17963 अन्वये **अमितकुमार विश्वनाथ पोलके (Amitkumar Vishwanath Polkey )** असे नवीन नाव धारण केलेले आहे.यास्तव,यापुढे बिनतारी संदेश विभागाच्या सर्व शासकीय अभिलेखात ,पोलीस हवालदार/यंत्रचालक अमित विश्वनाथ पोलके यांचे नाव **अमितकुमार विश्वनाथ पोलके (Amitkumar Vishwanath Polkey )** असे नमुद करण्याची अनुमती देण्यात येत आहे.त्यानुसार सर्व शासकीय अभिलेखात योग्य तो बदल करण्यात यावा.पोलीस हवालदार/यंत्रचालक अमित विश्वनाथ पोलके नेमणुक बि सं वि नागपुर शहर यांचे सेवापुस्तकात योग्य ती नोंद घेऊन राजपत्राची प्रत सेवापुस्तकात जोडण्यात यावी.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई -३/यंचा/नावात बदल/ २०१७ /५६२७ दि. १३/११/२०१७ )**

**३.** पोलीस हवालदार/यंत्रचालक शोभा नंदलाल भगोरे, नेमणुक बि सं वि बीड यांनी, त्यांचा विवाह झाल्यामुळे महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन, ओ-12, 5 एप्रिल 2012 चैत्र 16, शके 1934 पान क्र.37 नोंदणी क्र ए -795 अन्वये **शोभा संजय वडोदे** असे नवीन नाव धारण केलेले आहे.यास्तव, यापुढे बिनतारी संदेश विभागाच्या सर्व शासकीय अभिलेखात, पोलीस हवालदार/यंत्रचालक शोभा नंदलाल भगोरे यांचे नाव **शोभा संजय वडोदे** असे नमुद करण्याची अनुमती देण्यात येत आहे.त्यानुसार सर्व शासकीय अभिलेखात योग्य तो बदल करण्यात यावा. पोलीस हवालदार/यंत्रचालक शोभा नंदलाल भगोरे नेमणुक, बि सं वि बीड यांचे सेवापुस्तकात योग्य ती नोंद घेऊन राजपत्राची प्रत सेवापुस्तकात जोडण्यात यावी

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई -३/यंचा/ भगोरे/ नावात बदल/२०१७ /५६२६ दि.१३/११/२०१७ )**

**४.** ईश्वर संतोष पवार पोहवा/बियंचा नेमणुक बि सं वि मुंबई यांनी महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन, जून १४, २००७ ज्येष्ठ २४, शके १९२९ नोंदणी क्र एक्स-५१३७ अन्वये ईश्वर संतोष पवार ऐवजी **ईश्वर संतोष सुतार** असे नवीन नाव धारण केलेले आहे. यास्तव, यापुढे बिनतारी संदेश विभागाच्या सर्व शासकीय अभिलेखात ,पोलीस हवालदार/यंत्रचालक ईश्वर संतोष पवार यांचे नाव **ईश्वर संतोष सुतार** असे नमुद करण्याची अनुमती देण्यात येत आहे. त्यानुसार सर्व शासकीय अभिलेखात योग्य तो बदल करण्यात यावा. पोलीस हवालदार/यंत्रचालक ईश्वर संतोष पवार पोहवा/बियंचा नेमणुक बि सं वि मुंबई यांचे सेवापुस्तकात योग्य ती नोंद घेऊन राजपत्राची प्रत सेवापुस्तकात जोडण्यात यावी.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई -३/यंचा/ पवार / नावात बदल / २०१७ /५७१६ दि. २०/११/२०१७ )**

दिनांक : १३ /१२/२०१७

Sd/-

**( सी.ए.ढाकणे )**
**पोलीस अधीक्षक, बि.सं. (मुख्या),**
अपर पोलीस महासंचालक व संचालक,
पोलीस बिनतारी संदेश, म.रा.पुणे, कार्यालय